## जिल्हा निर्यात प्रचलन समितीची  सभा दिनांक ३० ऑगष्ट २०२१ च्या सभेचे इतिवृत्त

दिनांक ३० ऑगष्ट २०२१ रोजी दुपारी ३.०० वा.जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा येथे भंडारा जिल्हा जिल्हा निर्यात प्रचलन समितीची सभा मा.निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.शिवराज पडोळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

१.श्री. एच. के. बदर- महाव्यव्स्थापक ,जिल्हा उद्योग केंद्र,भंडारा.

२ श्री .अशोक कुंभलवार जिल्हा अग्रणी बँक,भंडारा.

३.श्री संदीप देवगीरकर, व्यवस्थापक,नाबार्ड, भंडारा.

४ श्री. अरूण बलसाने,कृषी उपसंचालक,जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय ,भंडारा.

५.श्री मंगेश काटे ,जीएसटी कार्यालय ,भंडारा.

६.श्री शिरीष निर्वाण, अगरबत्ती क्लस्टर,लाखनी.

७.श्री. एस.आर.तिवारी,व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,भंडारा.

सभेस खालीलप्रमाणे अधिकारी ऑनलाइन पध्दतीने उपस्थित होते.

१. श्री.दिलीच कोचे , प्रतिनीधी DGFT ,नागपूर.

२. श्रीमती प्रणाली पखाले, EY,DGFT ,नागपूर

३.श्री निखाडे ,एमएसएमई ,नागपूर.

सभेच्या सुरूवातीला श्री. एच.के.बदर- महाव्यव्स्थापक ,जिल्हा उद्योग केंद्र,भंडारा यांनी उपस्थितांचे स्वागत करून भंडारा जिल्हयाचा Dist. Action Plan जिल्हा कृती आराखडा सादर केला.

- त्यांमध्ये जिल्हयाची भौगोलिक माहिती देण्यात आली .आराखडयामध्ये जिल्हयाची औद्योगिक रूपरेषा तसेच जिल्हयातील निर्यात होणा-या वस्तुंचा अहवाल यांचा समावेश करण्यात आला याशिवाय जिल्हयात स्थापन होणा-या औद्योगिक समुह याबाबतची माहिती समाविष्ट केली
- त्यानंतर आराखडयामध्ये निर्यात करतांना येणा-या अडचणी व त्यादृष्टीने निर्यातक्षम वस्तुंच्या निर्यातीस चालना देण्याच्या उपाययोजना यांचा समावेश करण्यात आला .त्यांमध्ये निर्यातदारांचे प्रशिक्षण ,निर्यातदारांना निर्यातक्षम उत्पादने , निर्यातीस वाव आणा-या देशांची माहिती ईत्यादींची अद्यावत माहिती उपलब्ध करणे.निर्यात वाढण्याच्या दृ ष्टीने पायाभुत सोईसुविधा जसे गोदाम,कोल्ड स्टोरेज स्थापन करणे ,निर्यात वस्तुंचा दर्जा वाढवण्याकरिता सामाईक सु वि धा केंद्र स्थापन करणे तसेच निर्यातदारांना प्रोत्साहन देणे अंतर्गत कमी व्याज दरावर वित्तपुरवठा विद्युत शुल्क कमी करणे,निर्यात वाहतुकीस अनुदान देणे ईत्यादी धोरणांचा आराखडयामध्ये समावेश करण्यात आला.
- आराखडयामध्ये काही सुचना व दुरूस्ती करायची असल्यास तसे करण्याचे आवाहन केले .चर्चेअंती आराखडयास मान्यता देण्यात आली.तसेचदिनांक २१ ते २७ सप्टेंबर २०२१ दरम्यान निर्यात जागृती आठवडा साजरा करण्याचे सर्वांना आवाहन केले.
- सभेच्या शेवटी निर्यातदारांना येणा-या अडचणींबाबत चर्चा करण्यात आली.श्री शिरीष निर्वाण अगरबत्ती निर्यातदार यांनी अगरबत्ती करिता लागणारा कच्चा माल हा जिल्हयात उपलब्ध नसुन तो आसाम व चीन या देशातून आणावा लागत असल्याचे सांगितले.त्यावर मा. अध्यक्षांनी अगरबत्ती काडया करिता

लागणारा बांबू ,बांबूचे उत्पादन जिल्हयात घेण्याच्या दृष्टीने वन विभाग व कृषी विभाग यांनी शेतक-यांना  प्रोत्साहित  करण्याच्या सुचना केल्या.

- तसेच श्री निर्वाण यांनी  सुगंधीत अगरबत्तीस परदेशात फार मागणी असुन त्यांकरिता  लागणा-या गुलाब,चंदन,सिट्रोनिला .नागरमोथा व नैसर्गिक सुगंधी उत्पादने जिल्हयात झाल्यास  उत्पादन खर्च कमी होउन निर्यात वाढेल. मा.अध्यक्षांनी त्यांबाबत शेतक-यांना मार्गदर्शन करण्याच्या दृ ष्टीने कृषी विभागांस निर्देश दिले .
- शेवटी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले .

महाव्यवस्थापक .

जिल्हा उद्योग केंद्र ,भंडारा.